यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई–मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479
परीक्षा विभाग / Examination Division

जावक क्र. परीक्षा/मे 2023/ 1198 दिनांक : 06/03/2023

## पूर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी – परीक्षा अर्ज भरण्याबाबत महत्वाच्या सूचना

1) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या उन्हाळी / सत्रनिहाय परीक्षा मे 2023 दिनांक 24 मे 2023 पासून आयोजित करण्याचे नियोजित आहे. सर्व शिक्षणक्रमांच्या परीक्षेचे वेळापत्रक हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर एप्रिल 2023 च्या शेवटच्या आठवड्यात उपलब्ध होईल. या परीक्षेसाठी उपलब्ध शिक्षणक्रमांचा तपशील सोबत जोडला आहे. तेवढ्याच शिक्षणक्रमांच्या परीक्षांचे आयोजन केले जाईल.

2) 16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असलेल्या सर्व पूर्नपरीक्षार्थीनी संबंधित शिक्षणक्रमांच्या परीक्षेसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज खालील मुदतीत सादर करावा.

| **ऑनलाइन परीक्षा अर्ज सादर करण्याची मुदत** | | |
|---|---|---|
| 1 | विनाविलंब शुल्कासह | **दिनांक : 16/03/2023 ते 31/03/2023** |
| 2 | विलंब शुल्कासह **(रु.100/- सह)** | **दिनांक : 01/04/2023 ते 08/04/2023** |
| 3 | विशेष विलंब शुल्कासह **(रु.500/- सह)** | **दिनांक : 09/04/2023 ते 13/04/2023** |

मात्र यानंतर कुठल्याही कारणास्तव मुदतवाढ राहणार नाही.

3) सर्व शिक्षणक्रमांच्या पूर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठीचे शुल्क खालीलप्रमाणे दर्शविले आहे.
   i. प्रमाणपत्र/पदविका/पदवी (व्यावसायिक/तांत्रिक/सायन्स वगळून) लेखी परीक्षा रु.130/-प्रती पेपर
   ii. पदव्युत्तर पदवी आणि सर्व शिक्षणक्रम पदवी व्यावसायिक/तांत्रिक/सायन्सचे सर्व शिक्षणक्रम लेखी परीक्षा रु. 150/- प्रती पेपर
   iii. प्रात्यक्षिक/व्हिवावोस (Viva) रु. 300/- प्रती पेपर
   iv. मार्कशीट फि. रु. 100/- प्रती सेमिस्टर/ प्रती वर्ष जेवढे विषय नापास आहेत त्या सर्व विषयांचे परीक्षा शुल्क भरावे लागेल. परीक्षा अर्ज व शुल्क प्रत्येक नापास सेमिस्टर/वर्षासाठी भरावे लागेल. ऑनलाईन परीक्षा अर्ज भरताना Debit Card/Credit Card/Net Banking या मार्फत परीक्षा शुल्क भरता येईल.

4) बी.ए./बी.कॉम. च्या ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश करून नोंदणी कालावधी पूर्ण झाले आहेत, उदा. 8 वर्ष, 5 वर्ष. त्या विद्यार्थ्याचा नोंदणी कालावधी संपलेला आहे. तसेच इतर शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्याचा नोंदणीचा विहित कालावधी माहिती पुस्तिकेतील नियमानुसार संपलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी त्या **शिक्षणक्रम नियमांच्या अधीन राहून प्रथम पूर्ननोंदणी (Re-registration) केल्यानंतरच ऑनलाईन परीक्षा अर्ज भरावा.** BA, B.Com, शिक्षणक्रमांसाठी पुर्ननोंदणी करणेसाठी पुढील विद्यापिठाच्या होम पेज वरती **Re-registration (BA/B.Com)** या टॅबवरती **(https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1412)** लॉग इन करून पुर्ननोंदणी शुल्क भरून प्रक्रिया पूर्ण करावी प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी २ दिवस लागतील, त्यानंतर परीक्षा अर्ज भरता येईल. बी.ए./बी.कॉम शिक्षणक्रम वगळता इतर शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांनी पूर्ननोंदणी शुल्क हे माहितीपुस्तिकेत दिलेल्या माहितीनुसार एकूण शिक्षणक्रम शुल्काच्या 50% + परीक्षा शुल्क भरावे

आणि ऑफलाईन परीक्षा अर्ज + शुल्काचा DD अथवा RTGS / NEFT पावती जोडून Speed Post ने **Controller of Examinations, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik - 422222** या पत्त्यावर विहित मुदतीत पाठवावी. या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ऑनलाईन भरता येणार नाही.

5) 9 अंकी कायम नोंदणी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणी करून 14 वर्ष होऊन गेल्याने त्यांचा नोंदणी कालावधी संपला असल्याने परीक्षेला बसता येणार नाही. 9 अंकी नोंदणी क्रमांकाच्या कुठल्याही वर्षाचा परीक्षा अर्ज यापुढे ऑफलाईन स्वीकारला जाणार नाही. या विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश घ्यावा लागेल.
6) विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश-पत्र (हॉलतिकीट) पोर्टलला ऑनलाईन उपलब्ध करून दिले जाईल. विद्यार्थी यादी विद्यापीठ वेबसाईट / पोर्टलला प्रसिद्ध केली जाईल, स्वतंत्रपणे पाठवले जाणार नाही.
7) विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा ऑफलाईन / पारंपारिक लेखी पद्धतीने प्रत्यक्ष विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर घेतली जाईल. सदरची परीक्षा ही UGC आणि महाराष्ट्र शासनाचे कोविड-19 संबंधीचे वेळोवेळी प्राप्त निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित केली जाईल.
8) प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षेच्या अद्ययावत माहितीसाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ वेळोवेळी पाहावे, परीक्षेसंबंधी सर्व माहिती पोर्टलवर प्रसिध्द केली जाईल. अभ्यासकेंद्र अथवा विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे कळवले जाणार नाही.

**सर्व परीक्षार्थी, अभ्यासकेंद्र आणि विभागीय केंद्र यांनी वरील सूचनांची नोंद घ्यावी.** विभागीय केंद्र यांनी वरील सर्व बाबी आपल्याशी संलग्नित सर्व अभ्यासकेंद्राना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावी.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत** – (1) विभागीय संचालक, य.च.म.मु.वि. सर्व विभागीय केंद्र
(2) उपकुलसचिव, परीक्षा-1 परीक्षा-2 आणि 3
(3) प्रमुख, संगणक कक्ष
(4) श्री. प्रेमनाथ सोनवणे, डेटा प्रोसेसिंग सुपरवाईजर – पोर्टलला प्रसिद्धीसाठी
5) प्रमुख, एम.के.सी.एल.